RNI No. MAHBIL /2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष ३, अंक १७(२)] सोमवार, एप्रिल २४, २०१७/वैशाख ४, शके १९३९ [पृष्ठे ४ किंमत : रुपये ९.००

## असाधारण क्रमांक २३

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.

### अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/लिगल/पारेषण परवाना अटी/२०१७/०१९०१.—विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४" ('मुख्य विनियम') मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे, जसे की :—

१. **संक्षिप्त शीर्षक व प्रारंभ**

(१) या विनियमांना, " महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) (दुसरी सुधारणा) विनियम, २०१७", असे म्हणावे.

(२) हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **मुख्य विनियमांच्या विनियम ४-अ मध्ये सुधारणा**

दिनांक २१ डिसेंबर २००६ च्या सुधारणेद्वारे मुख्य विनियमांमध्ये समाविष्ट करण्यात आलेला विनियम ४-अ खालीलप्रमाणे बदलण्यात येईल, जसे की ,—

" ४-अ पात्रतेच्या अटी/अपात्रता

या विनियमांखाली परवाना मंजुरीकरिता पात्र ठरण्यासाठी पात्रतेच्या अटी/अपात्रता आयोग विनिर्दिष्ट करू शकेल.

वर नमूद केलेल्या बाबींतील सर्वसाधारणता काहीही असली तरी, अधिनियमाखालील कर्तव्ये आणि बंधनांचे पालन करण्यासंबंधात सध्याची स्थिती किंवा परिस्थिती अर्जदाराच्या क्षमतेबाबत, आयोगाच्या मते, शंका निर्माण करणारी असेल तर, कोणताही अर्जदार या विनियमांखाली परवाना मंजुरीसाठी पात्र ठरणार नाही.

**स्पष्टीकरण.——**या विनिमांच्या प्रयोजनार्थ 'स्थिती किंवा परिस्थिती' म्हणजे व त्यामध्ये, अर्जदार किंवा त्याच्या कोणताही भागीदार, संचालक किंवा प्रवर्तकाविरुद्ध न्यायालयामध्ये गुन्हा शाबित झालेली प्रकरणे, किंवा नियामक प्राधिकरणाने आरोप ठेवलेली/प्रतिकूल आदेश दिलेली प्रकरणे किंवा जी समाजाच्या/जमातीच्या नैतिक श्रद्धेला धक्का लागल्यामुळे संताप निर्माण करणाऱ्या एखाद्या गंभीर स्वरुपाच्या अपराधाशी संबंधित असतील ; अर्जदार किंवा त्याच्या कोणत्याही भागीदार, संचालक किंवा प्रवर्तकाची नादारी किंवा दिवाळखोरी ; नैतिक अधःपतन अंतर्भूत असलेला गुन्हा शाबित होणे, किंवा कोणताही आर्थिक गुन्हा ; लबाडीच्या आणि अनुचित व्यापार प्रथा किंवा बाजारातील हातचलाखी ; आर्थिक सचोटी ; सक्षमता ; लौकिक आणि चारित्र्य आणि अन्य कोणतीही पुरेशी कारणे, यांचा समावेश असेल.

परंतु असे की, आयोगाच्या कार्यालयात आणि/किंवा त्याच्या इंटरनेटवरील संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमुन्यातील हमीपत्राबरोबर आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली कागदपत्रे आणि माहिती, अर्जदाराला त्याच्या अर्जासोबत पाठविण्यास आयोग सांगू शकेल.

परंतु आणखी असे की, अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय परवाना मंजुरीसाठीचा कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाही."

**अश्वनी कुमार सिन्हा,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक २४ एप्रिल २०१७.

**टीप.—**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ **शासकीय राजपत्रात** १० जून २००४ रोजी अधिसूचित करण्यात आले होते. या विनियमांमध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००६ द्वारे २१ डिसेंबर २००६ रोजी प्रथम सुधारणा करण्यात आली होती.

**MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION**

World Trade Centre, Centre No.1, 13th Floor, Cuffe Parade, Mumbai 400 005

**Email :** *mercindia@mercindia.org.in, mercindia@merc.gov.in*

**Website :** *www.mercindia.org.in,www.merc.gov.in*

*NOTIFICATION*

ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/Legal/Transmission Licence Conditions/2017/01900: In exercise of the powers conferred under Section 181 of the Electricity Act, 2003 and all other powers enabling it in this behalf, the Maharashtra Electricity Regulatory Commission hereby makes the following Regulations to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (Transmission Licence Conditions) Regulations, 2004 ('the principal Regulations'), namely :

1. **Short title and commencement**

(*a*) These Regulations may be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Transmission Licence Conditions) (Second Amendment) Regulations, 2017.

(*b*) These Regulations shall come into force from the date of their publication in the *Official Gazette.*

2. **Amendment of Regulation 4-A of the principal Regulations**

Regulation 4-A added in the principal Regulations *vide* amendment dated 21st December, 2006 shall be substituted by the following, namely :—

*"4-A: ELIGIBILITY CONDITIONS/DISQUALIFICATIONS :*

*The Commission may specify eligibility conditions and disqualifications for being entitled to grant of licence under these regulations.*

*Notwithstanding the generality of the foregoing, no applicant shall be qualified for grant of licence under these regulations if the Commission is of the opinion that conditions or circumstances exist that cast a doubt on the ability of the applicant to perform its duties and obligations under the Act.*

*Explanation – For the purposes of these regulations, "conditions or circumstances" shall mean and include cases of conviction of the applicant or any of its partners, directors or promoters by a Court of Law or indictment/adverse order by a regulatory authority or which relates to a grave offence of such a nature that it outrages the moral sense of the community; insolvency and bankruptcy of the applicant or any of its partners, directors or promoters; conviction of an offence involving moral turpitude, or any economic offence; fraudulent and unfair trade practices or market manipulation; financial integrity; competence; reputation and character, and any other sufficient reasons.*

*Provided that the Commission may direct the applicant to furnish with its application an undertaking in such form and accompanied by such documents and information as may be stipulated by the Commission from time to time, which shall be available from the office of the Commission and/or its internet website.*

*Provided further that no application for grant of licence shall be rejected unless such applicant has been given an opportunity of being heard."*

ASHWANI KUMAR SINHA,
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory Commission.

Mumbai,
Dated 24th April, 2017.

Note :—The Maharashtra Electricity Regulatory Commission (Transmission Licence Conditions) Regulations) 2004 were notified in the *Official Gazette* on 10th June, 2004. These were further amended by the Maharashtra Electricity Regulatory Commission (Transmission Licence Conditions) Regulations, 2006 on 21st December, 2006.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.